# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०७/२०२५ (गुरूवार)**

---

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी (NDPS) गुन्हयामध्ये सहभाग असलेल्या १० आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावला आहे

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात खापरखेडा पोलीसांनी आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी अवैध अंमली पदार्थ गुन्हयामध्ये सामील असलेल्या टोळीच्या १० सदस्यांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ लावला आहे. सदर टोळीचा म्होरक्या आरोपी नामे १) आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे,रा.वार्ड नं. ३ चनकापूर आणि त्याचे साथीदार आरोपी क्रं २) रोहित देशराज सुर्यवंशी ,वय ३२ वर्षे, रा. वार्ड नं. ३,चनकापूर ता. सावनेर ,३) सुरज उर्फ बारीक रमेश वरणकर, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं.६ चनकापूर,४) विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्ष, रा. पारधी बेडा तिडगी, ता. कळमेश्वर, ५) अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग, वय २९ वर्षे, रा. वार्ड नं. ६ वलनी, ६) गब्बर दत्तूजी जुमळे ,वय ३० वर्षे, रा. वार्ड नं. ६ वलनी, ७) उदयभान गंगासागर चव्हाण ,वय ३२ वर्षे, रा. वार्ड नं. ६ वलनी ८) लखनसिंग उर्फ विजय सिंग दिलीप सिंग सिकलकर (भटीया), वय ३५ वर्ष,रा. सिंगनूर पोस्टे गोगावा, जि. खरगोन मध्य प्रदेश, मुलताई जिल्हा बैतूल (मध्य प्रदेश),९) शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत, वय २३ वर्ष,रा.ग्राम चौभीया,ता. मुलताई,जि बैतुल (१०) राकेश उर्फ सोनु शिवलाल सुर्यवंशी, वय ३० वर्ष, रा. वार्ड नं ६ वलनी या १० आरोपीतांविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (डळ्ळ।) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २७/०४/२०२५ रोजी **पोलीसांना गुप्त बातमी दारा मार्फतीने खबर मिळाली की, सावनेर मधील गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे, वार्ड नं. ३ चनकापूर हा वलनी येथील अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग च्या घरी हजर असुन त्यांच्या कडे अग्निशस्त्रे आहे.या खबरेवरून पोलीसांनी** अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याचे घरी वार्ड क्र ३ वलनी येथे धाड टाकली असता तेथे आरोपी **अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग** ,आरोपी नामे **आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा** आणि **गब्बर दत्तूजी जुमळे,** हे मिळुन आले. घरझडतीमध्ये **पोलीसांनी १०२८.०५ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा सदृश्य वनस्पती ६ अग्निशस्त्रे, ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुगळी, ८ ॲंड्रॉईड फोन आणि सिमकार्डय असा एकुण २,७१,८०० रु किंमती चा मुद्देमाल जप्त केला. आणि नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ८ (सी) ,२० (बी) (२), २९ एन.डी.पी.एस. सहकलम ३/२५, ५/२५ भारतीय शस्त्र अधिनियम कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाचे तपास कामी विशेष तपास पथक गठित करण्यात आले होते. सदर पथकाने सदर गुन्हयाचाा सखोल तपास करून गुन्हयात अनेक बाजु उकल करून, साखळी जोडुन अंमली पदार्थ पुरवठा व विक्री करणारे इतर आरोपीतांचा नमुद गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. आरोपी क्र १ ते ७ यांना अटक करण्यात आली असुन आरोपी कं ९ शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत, वय २३ वर्ष,रा.ग्राम चौभीया,ता. मुलताई,जि बैतुल याला मध्यप्रदेश मधुन अटक करण्यात आली.**

सदर गुन्हयातील आरोपीतांचा गुन्हेगारांचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता असे निर्दशनास आले की, यातील आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे,रा. वार्ड नं. ३ चनकापूर आणि त्यांचे ईतर साथीदारांची गुन्हेगारी करणारी टोळी असुन ते संघटीत रित्या आर्थिक फायदयासाठी अंमली पदार्थाची विक्री करणे तसेच परिसरात त्यांचे टोळीची दहशत पसरविणसाठी, खुन, खुनाचा प्रयत्न करने, प्राणघातक शस्त्र बाळगणे, अवैध अग्निशस्त्र विक्री करणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे तसेच गंभीर दुखापत पोहचवून जिवे मारण्याची धमकी देणे, अवैध्य रित्या दारू विक्री करणे व अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. सदर संघटीत रित्या गुन्हेगारी करणाऱ्या टोळीचा म्होरक्या आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा, वय २५ वर्षे,रा.वार्ड नं. ३ चनकापूर ता. सावनेर जिल्हा नागपूर, हा असुन त्याने अल्प कालावधी मध्ये वलनी व चनकापुर परिसरात स्वत:चे गुन्हेगारी साम्राज्य निर्माण केलेले आहे. आरोपी आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा,हा नेहमीच त्याचे टोळीतील साथीदार तसेच त्यांचे

व्यतिरीक्त आणखी नव—नवीन सदस्यांना सोबत घेवुन गुन्हे करीत असतो. टोळीचा म्होरक्या आरोपी नामे आशिष उर्फ गुल्लू आणि टोळीतील सदस्यांवर अनेक दखलपात्र गंभीर गुन्हे नोंद आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. त्यामुळे नमुद १० आरोपीच्या टोळीवर १० आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) लावण्यात आला आहे.



आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा






रोहित देशराज सुर्यवंशी

सुरज उर्फ बारीक रमेश वरणकर



विश्वास राहुल सोलंकी



अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग



गब्बर दत्तूजी जुमळे



उदयभान गंगासागर चव्हाण



**शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत,**

## श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर), धापेवाडा येथे मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट

दरवर्षी प्रमाणे पोस्टे कळमेश्वर अंतर्गत श्री. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान ट्रस्ट धापेवाडा (विदर्भाचे पंढरपूर) येथे आषाढी एकादशी निमित्य दिनांक ०६/०७/२०२५ व दि. ११/०७/२०२५ रोजी यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर यात्रेला अंदाजे ९० ते ९५ हजार पेक्षा जास्त भाविक तसेच २५० ते ३०० पेक्षा जास्त दिंड्या आणि पालख्यांचे आगमन होत असते.

सदर ठिकाणी आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजी मा.श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी भेट दिली. सदर भेटी दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांनी संपुर्ण देवस्थान परीसराची पाहणी केली. देवस्थान मंडळाचे पदाधिकारी, यात्रेचे आयोजक यांच्या सोबत चर्चा करून उपाययोजनांबाबत माहीती घेतली आणि त्यांना सुचना दिल्या. नदी पत्रात कोणीही उतरू नये या बाबत उपाययोजना कराव्यात, नदीच्या पुलावर दोन्ही बाजुला मजबुत बॅरीकेट करावे आणि मधुन रस्ता ठेवावा, तसेच आपत्ती व्यवस्थापन पथकाला हजर ठेवावे व

ईतर महत्त्वाच्या सुचना दिल्या. सदर वेळी श्री अनिल म्हस्के, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,सावनेर विभाग, कळमेश्वर पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांधे आणि सावनेर पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी, पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील  असे हजर होते.  योग्य बंदोबस्त लावण्या बाबत सुचना आहे.









## मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी मोहरम सणाचे आयोजकांची घेतली बैठक आणि मोहरम सणाच्या मार्गाची केली पाहणी

आज दिनांक ०३/०७/२०२५ रोजीमा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी आगामी मोहरम सण असल्याने पोलीस स्टेशन काटोल येथे भेट मोहरम सणाचे आयोजकांची बैठक घेतली. कायदा व सुव्यसस्था अबाधित राखुन मोहरम सण शांततेत पार पाडण्याबाबत सुचना दिल्या. तसेच मोहरम सणाच्या मार्गाची चौबे लेआउट ते डोके कॉम्पेक्स ते पटेल बिल्डींग ते पोलीस स्टेशन काटोल ते आंबेडकर चौक ते गळपुरा चौक ते मरामाय नगर या मार्गाची पाहणी केली. सदर वेळी दरम्यान श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग, काटोल आणि श्री रंजित सिरसाठ, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन काटोल असे हजर होते.


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ४ गुन्हे नोंद, १ कोटी २२ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त, रामटेक पोलीसांची कारवाई ४ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक ०३/०७/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सोनेघाट टोल येथे पेट्रोलींग करून खालील प्रमाणे कारवाई करून चार गुन्हे नोंद केले.

**कारवाई कं १.** रामटेक पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान संशयीत वाहन टिप्पर क्र एम एच ४९ सी एफ ०७७७ चा या वाहनला थांबवुन वाहनाची पाहणी केली तिन्ही वाहनामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी नामे प्रकाश शालिक खंडारे, वय ३८ वर्षे, रा. बेजनबाग, गुरूनानक शाळेजवळ,नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता राहुल वर्मा ,रा. वैशाली नगर, नागपुर** असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टिप्पर क्र एम एच ४९ सी एफ ०७७७ **किंमती ३०,००,०००/—रूपये आणि १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये असा एकुण ३०,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई कं २.** रामटेक पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान संशयीत वाहन टिप्पर क्र एम. एच. ४० सी एम ३३६१ चा या वाहनला थांबवुन वाहनाची पाहणी केली तिन्ही वाहनामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी नामे शेषराव वसंताजी मारबते, वय ३६ वर्षे, रा. कोडगाव ता मौदा ,नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता खुशाल थोटे ,रा. भुगाव ता कामठी,जि. नागपुर** असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टिप्पर क्र एम. एच. ४० सी एम ३३६१ **किंमती ३०,००,०००/—रूपये आणि १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये असा एकुण ३०,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई कं ३.** रामटेक पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान संशयीत वाहन टिप्पर क्र एम. एच. ४० सी टी ८८१० चा या वाहनला थांबवुन वाहनाची पाहणी केली तिन्ही वाहनामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी नामे विक्की उर्फ दद्दु उत्तम शिंदेमेश्राम, वय २० वर्षे, रा.**

**सोनेगाव राजा ता कामठी ,नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता महेश वंजारी ,रा. नेरी, ता कामठी, नागपुर** असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टिप्पर क्र एम. एच. ४० सी टी ८८१० **किंमती ३०,००,०००/—रूपये आणि १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये असा एकुण ३०,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं ४.** रामटेक पोलीसांना पेट्रोलींग दरम्यान संशयीत वाहन टिप्पर क्र एम. एच. ४० बि एफ ५१५६ चा या वाहनला थांबवुन वाहनाची पाहणी केली तिन्ही वाहनामध्ये रेती आढळुन आली. वाहन **चालक आरोपी नामे चक्रधर उर्फ विकास संजय बंधाटे, वय २२ वर्षे, रा. सिहोरा, कन्हान जि. नागपुर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता हरीदास वंजारी ,रा. नेरी, ता. कामठी, नगर नागपुर** असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टिप्पर क्र एम. एच. ४० बि एफ ५१५६ **किंमती ३०,००,०००/—रूपये आणि १० ब्रास रेती किंमती ६०,०००/— रूपये असा एकुण ३०,६०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई मध्ये एकुण १,२२,४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद वाहन चालक आणि मालक आरोपी यांच्याविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि अन्वये ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. नमुद ४ चालक आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**



प्रकाश शालिक खंडारे



शेषराव वसंताजी मारबते




विक्की उर्फ दद्दु  उत्तम शिंदेमेश्राम



विकास संजय बंधाटे

# अवैधरित्या रेतीचा साठा करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ४० हजारांचा मुद्देमाल जप्त, पारशिवणी पोलीसांची कारवाई २ आरोपी अटक

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक ०३/०७/२०२५ रोजी पारशिवणी पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पारडी शिवारात काकडे विट भट्टी जवळ खाली पडीक जागेत आरोपी प्रतिक रामराव घारड, रा. पारडी खंडळा, ता. पारशिवणी आणि प्रज्वल प्रमोद पंचभाई, रा. रोहणा, ता पारशिवणी या दोघांनी मिळुन आपल्या ट्रॅक्टर ट्रॉलीने मौजा पारडी शिवारातील कन्हान नदी चे पात्रातुन अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरी करून रेती चा साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता अवैध रित्या रेतीचा साठा करून असल्याचे दिसले. पोलीसांनी पंचासमक्ष **२० ब्रास रेती किंमती ४०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद प्रकरणी प्रतिक रामराव घारड, वय २१ वर्षे रा. पारडी खंडळा, आणि प्रज्वल प्रमोद पंचभाई, वय २३ वर्षे, रा. रोहणा, ता पारशिवणी यांच्याविरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**






**प्रतिक रामराव घारड** **प्रज्वल प्रमोद पंचभाई,**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०२/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०३/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री दिपक अग्रवाल ,सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत जुनी वस्ती, सातगाव, बुटीबोरी झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि बुटीबोरी चौकात नाकाबंदी करण्यात आली. सदर वेळी पोलीस स्टेशन बोरी येथील अधिकारी ,अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी, सलई दाबा, गणेशपुर येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर वेळी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथील अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथक चे पोलीस अंमलदार हजर होते. सदर कोबिंग ऑपरेशन श्री दिपक अग्रवाल यांच्या नेतृत्वात राबवुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच गार्डन चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली.


पैरागॉन













**अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १५ गुन्हे नोंद एकुण १२,१४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त**

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०२/०७/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १२,१४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी क्रं १)** श्रीकृष्णा दिवाकर साहारे वय ३० वर्ष रा.वार्ड क्र. ०१ निमतलाई **आरोपी क्रं २)** आरोपी शैलेश धनराज बोरकर, वय.३० वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर, जि. नागपूर, **आरोपी क्रं ३)** नामदेव महादेव सौसागडे, वय ६७ वर्ष रा.कोथुळना, ता. सावनेर जि. नागपुर, **आरोपी क्रं ४)** महादेव चोखीनाथ वंजारी, वय ४२ वर्ष, रा.वाकी, ता. सावनेर जि. नागपुर आणि **आरोपी क्रं ५)** महीला आरोपी यांचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी क्रं १)** मूलीधर दूर्गाजी हटवार वय ५६ वर्ष रा क्वॉर्टर न ०५ , १६ मायनस कॉलनी डब्लू सी एल, वाघोडा, सावनेर , **आरोपी क्रं १)** अक्षय उर्फे विक्की सिध्दार्थ पक्कीडडे

वय ३२ वर्ष  रा वाार्ड क्र ०५ बाजार चौक मठ मोहल्ला पाटण सांवगी, **आरोपी क्रं २)** गजानन ईश्वर कोल्हेकर,  वय ३३ वर्ष, रा. पहलेपार, सावनेर, **आरोपी क्रं ३)**  अंकुश पांडुरंग बानाईत वय ३५ वर्ष  रा.माथाखेडी सावनेर आणि एक **आरोपी क्रं ४)**  महीला आरोपी याचेवर यांचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे एका महीला आरोपीवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन केळवद** येथे वसंता विश्वनाथ धुर्वे वय ५२ वर्षे रा. उमरी ता. सावनेर जि. नागपूर हीचेवर **गुन्हा नोंद आहे**, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे सुर्या सुरज लोंढे, वय ३२ वर्ष, रा. वागदरेवाडी, विष्णुलक्ष्मी नगर,पावर हाऊस याचेवर **गुन्हा नोंद आहे,पोलीस स्टेशन खापरखेडा येथे** १.नगीनाप्रसाद संतलाल गौतम, वय ४८ वर्ष,२. आणि अजित अनिल सिंग, वय २९ वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र.६, वलनी, यांच्यावर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन अरोली येथे** सचिन रामेश्वर उके, वय २५ वर्ष, रा. धर्मापुरी यांच्यावर गुन्हा नोंद आहे अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १५ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने